मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना
मंडळाच्या दिनांक 30 ऑक्टोबर १९९३ रोजी
संपन्न झालेल्या १३ व्या [illegible] इतिवृत्त
[illegible]

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई

x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x

मंगळवार दिनांक ३० नोव्हेंबर १९९३ रोजी झालेल्या या बैठकीचा कार्यवृत्तांत:

..............................................................

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची १३ वी बैठक मंगळवार, दिनांक ३० नोव्हेंबर ९३ रोजी सकाळी ११.०० वाजता गृहनिर्माण भवनातील तिसऱ्या मजल्यावरील सभागृहात संपन्न झाली. या बैठकीस पुढील मान्यवर उपस्थित होते:

१] डॉ. शंकर वा. मटकर - सभापती
२] श्री. हेमराज शहा - उपसभापती
३] श्री. अशोक लाल - मुख्य अधिकारी.
४] श्री. यादवराव कांबळे - सदस्य
उपसचिव/गृहनिर्माण व
विशेष सहाय्य विभाग
महाराष्ट्र शासन
५] श्री. पोतदार - सदस्य
मुख्य अभियंता,
मुंबई महानगरपालिका
यांचे प्रतिनिधी
६] श्री. रॉकी क्रास्टो - सदस्य
७] श्री. गजेंद्र लष्करी - सदस्य
८] श्री. श्रीकांत पाटील - सदस्य
९] श्री. चेतन शहा - सदस्य
१०] श्री. आजम खान - सदस्य
११] श्री. विवेक भट्ट - सदस्य
१२] श्री. फारुख मन्सूरी - सदस्य
१३] श्री. शंकरराव पिटला - सदस्य
१४] श्री. कमलाकर शर्मा - सदस्य
१५] श्री. व्हि. बी. वरसकर - सदस्य
१६] श्री. ना. कृ. नाईक - निमंत्रित
उपकर निर्धारक व
संकलक

मा.सभापती, डॉ. शंकर दा. मटकर यांचे अध्यक्षतेखाली सभेस प्रारंभ झाला. सभेचे नियमित काम सुरू होण्यापूर्वी अध्यक्षांनी सूचना केली की, कालच दिवंगत झालेले भारताचे थोर सुपुत्र भारतरत्न जे.आर.डी.टाटा यांना सभागृहाने दोन मिनिटे स्तब्धता पाळून श्रध्दांजली अर्पण करावी. त्यानुसार सर्व उपस्थितांनी दोन मिनिटे स्तब्धता पाळून जे.आर.डी.टाटा यांना श्रध्दांजली अर्पण केली. त्यानंतर मा.सभापती, उपसभापती, सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करण्यांत आले व सभेच्या नियमित कामास सुरुवात झाली.

बाब क्रमांक : १३/१/१

विषय:- दिनांक १६ ऑक्टोबर ९३ रोजी झालेल्या मंडळाच्या १२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे.

दिनांक १६/१०/९३ रोजी झालेल्या १२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत पृष्ठ क्र.१ ते १९ वर सादर केला आहे. त्यावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाच्या १२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्यांत आला.

बाब क्रमांक : १३/१/२

विषय:- दिनांक २२ ऑक्टोबर १९९३ रोजी झालेल्या उपसमितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे.

दिनांक २२/१०/९३ रोजी झालेल्या उपसमितीच्या बैठकीचा अहवाल पृष्ठ क्र.२१ ते २९ वर सादर केला आहे. त्यावर सविस्तर चर्चा झाली. उपसभापती श्री.हेमराज शहा यांनी सूचना केली की, ज्या इमारतींच्या दुरुस्तीची देयके थकित आहेत. अशा प्रकरणी देयकांच्या किमान २५% रक्कम अदा करण्यांत यावी असा निर्णय झाला होता. कार्यवृत्तांतात याचा उल्लेख झालेला नाही. सविस्तर चर्चेअंती वरील निर्णयाचा समावेश कार्यवृत्तांतात

करावा असे ठरले. वरील सुधारणेसह दिनांक २२/१०/९३ च्या उपसमितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्यांत आला.

बाब क्रमांक : १३/२/१.

विषय :- अनुपालन अहवाल.

उपमुख्य अभियंता [पुनर्रचना] यांनी एकमजली इमारतींच्या पहाणीचा अहवाल पृष्ठ क्र.३१ वर सादर केला आहे, त्यांची नोंद घेण्यांत आली.

उपमुख्य अभियंता [दक्षिण] यांनी इमारत क्र.२१-सी, गोला लेन, वकील बिल्डींग या इमारतीच्या अनधिकृत बांधकामासंबंधीचा अहवाल पृष्ठ क्र.३३ वर सादर केला आहे. या अहवालाची नोंद घेऊन पुढील कार्यवाही करावी असे ठरले. पृष्ठ क्र.३३-अ मधील यादीतील क्षेत्रफळ चौ.मीटर ऐवजी चौ.फूट अशी दुरुस्ती करण्यांत आली.

श्री शंकरराव पिटला, सदस्य यांनी तक्रार केली की, पुनर्रचित इमारतीमधील रिक्त गाळ्यांचा अहवाल आयत्या वेळी सादर केलेला आहे व गाळे कधीपासून रिक्त आहेत याची माहिती दिलेली नाही. श्री कमलाकर शर्मा, सदस्य यांनी प्रतिपादन केले की, यादीत दर्शविल्यापेक्षा अधिक गाळे रिक्त आहे. त्यामुळे रिक्त गाळ्यांचा परिपूर्ण अहवाल सदस्यांना प्राप्त झाला पाहिजे अशी त्यांनी मागणी केली.

सहमुख्य अधिकारी यांनी खुलासा केला की, पुनर्रचित गाळ्यांमधील अनधिकृत व्यक्तींना नियमित करण्याचा कार्यक्रम युध्दपातळीवर हाती घेतल्यामुळे सर्व यंत्रणा या कामांत व्यग्र आहे. त्यामुळे रिक्त गाळ्यांचा अहवाल सादर करता आलेला नाही.

मुख्य अधिकारी यांनी प्रतिपादन केले की, रिक्त गाळ्यांमधील बरेचसे गाळे नजिकच्या काळांत पूर्ण झालेल्या इमारतीमधील आहेत व त्यांचे वितरण बृहत्सूची प्रमाणे करण्यांत येणार असल्यामुळे हे गाळे रिक्त आहेत. पदोर्ध...

काळ रिक्त असलेले गाळे १२० चौ.फूट क्षेत्रफळाचे व सामाइक संडास असलेले १६० चौ.फूट क्षेत्रफळाचे असल्यामुळे हे गाळे स्विकारण्यास भाडेकरु तयार नसल्यामुळे हे गाळे रिक्त आहेत. उरलेल्या रिक्त गाळ्यांची यादी व माहिती तसेच रिक्त गाळ्यांच्या वितरणासंबंधीचा प्रस्ताव लवकरच मंडळापुढे सादर करण्यांत येइल असे त्यांनी सांगितले.

तता : मुख्य अधिकारी [पु.गा.]

श्री.यादवराव कांबळे, उपसचिव यांनी सभागृहास माहिती दिली की, वाढीव दुरुस्ती खर्चाच्या मर्यादेच्या प्रमाणांत [रु.७५०/- प्रति चौ.मी.] दुरुस्ती उपकरांत वाढ करण्याच्या प्रस्तावासंबंधी प्रक्रीया पूर्ण झाल्या असून, लवकरच शासनाची मंजुरी अपेक्षित आहे.

मुख्य अधिकारी यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले की, शासनाने अनियोजित [-Non Plan] योजनांच्या अनुदानांत २०% कपात केलेली आहे. त्यामुळे शासनाकडून दुरुस्ती व पुनर्बांधणी कार्यक्रमासाठी मंडळास रु.१२ कोटी ऐवजी रु.९.६० कोटी अनुदान प्राप्त होइल यांची सर्व अधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी व त्यानुसार दुरुस्ती व पुनर्बांधणी कार्यक्रमांची कार्यवाही करावी.

बाब क्रमांक : १३/३/१

विषय :- पुनर्रचित इमारतींच्या नांवाचे प्रस्ताव.

पुनर्रचित इमारतीस नांव देण्याचे प्रस्ताव उपमुख्य अभियंता [पुनरचना] पृष्ठ क्र.४७ व ४९ वर सादर केले आहेत. त्यावर सविस्तर चर्चा होऊन प्रस्तावांस मंजूरी देण्यांत आली व पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला.

ठराव क्रमांक : १३/९४

१] ८३ सिताराम पोद्दार मार्ग, फणसवाडी, गिरगांव येथील पुनर्रचित इमारतीस "सद्भावना" हे नांव देण्याचा प्रस्ताव एकमताने मंजूर करण्यांत आला.

२) १०, लिंबूवाला चाळ, डॉर सताजी लेन, गणपतराव कदम मार्ग, लोअर परळ येथील पुनर्रचित इमारतीस "गणेश निकेतन" हे नाव देण्याचा प्रस्ताव एकमताने मंजूर करण्यात आला.

बाब क्रमांक : १३/३/२

विषय :- पुनर्बांधणी योजनेच्या खर्चास सुधारित प्रशासकीय मंजुरी मिळण्याविषयी.

इमारत क्र. २३-२५-२७ पहिला पारसी वाडा, डी-विभाग या पुनर्बांधणी योजनेच्या खर्चास सुधारित प्रशासकीय मंजुरी मिळण्याविषयीचा प्रस्ताव पृष्ठ क्र. ५१ वर सादर करण्यात आला आहे. उपमुख्य अभियंता [पुनर्रचना] यांनी या प्रस्तावाची सविस्तर माहिती सभागृहास दिली. सविस्तर चर्चेअंती प्रस्तावात सादर केल्याप्रमाणे योजनेच्या खर्चास सुधारित प्रशासकीय मंजुरी देण्याचा निर्णय घेण्यात आला.

ठराव क्रमांक : १३/९५

इमारत क्र. २३-२५-२७ पहिला पारसीवाडा, डी विभाग या पुनर्बांधणी योजनेच्या रु. १४,२०,४१८/- [रु. चौदा लक्ष, वीस हजार, चारशे अठरा फक्त] खर्चास सुधारित प्रशासकीय मंजुरी देण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

बाब क्रमांक : १३/४/१

विषय :- म्हाडा अधिनियम ८८ [३] [अ] अन्वये दाखल्याचे प्रमाणपत्र.

उपकरपात्र इमारतीच्या दुरुस्तीचा खर्च प्रमाणित मर्यादेपलिकडे गेल्यामुळे म्हाडा अधिनियम कलम ८८ [३][अ] अन्वये प्रदान करावयाच्या प्रमाणपत्राचे प्रस्ताव पृष्ठ क्र. ५३, ६१, ७१ व ८१ वर सादर केले आहेत. उपमुख्य अभियंता [उत्तर] व [दक्षिण] यांनी या प्रस्तावाची माहिती सभागृहास दिली. सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्ताव मंजूर करण्यात आले.

ठराव क्रमांक:१३/९६

संरचनात्मक दुरुस्तीचा खर्च प्रमाणित मर्यादा रु.७५०/- प्रति चौ.मीटर पेक्षा अधिक झाल्यामुळे पुढील उपकर पात्र इमारतींना म्हाडा अधिनियम ८८ [३] [अ] अन्वये प्रमाणित खर्चाच्या पाठिंब्यासाठी म्हणून प्रमाणपत्र देण्याचा निर्णय एकमताने घेण्यांत आला.

१] २४ अे, इराणी चाळ, दत्ताराम लाड मार्ग, एफ [दक्षिण] विभाग, परेल, मुंबई.

२] १३१ अे.बी.सी.खोजा चाळ, करी रोड, जी [दक्षिण] विभाग.

३] १२०-१२०-ए, गंगादाणी चाळ, करी रोड, जी [दक्षिण] विभाग.

४] ११३ भंडारी स्ट्रीट, सी १-२ विभाग.

बाब क्रमांक:१३/४/२

विषय:- उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीचे प्रस्ताव.

उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या खर्चास प्रशासकीय मंजूरीसाठी प्रस्ताव पृष्ठ क्र.८५ ते १०५ वर सादर केले आहेत. या प्रस्तावासंबंधी उपमुख्य अभियंता [दक्षिण] यांनी सविस्तर माहिती दिली.

मुख्य अधिकारी यांनी या संदर्भात सभागृहास माहिती दिली की गेल्या ४-५ वर्षांत म्हाडाने मुंबई मंडळास दुरुस्ती व पुनर्बांधणी खर्चासाठी सुमारे २६.०९ कोटी रुपयांचा निधी दिलेला आहे. शिवाय विविध वित्तीय संस्थांकडून रु.१२ कोटीचा निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. हा निधी सव्याज परत करण्याची जबाबदारी मंडळाची आहे. शिवाय शासनाने अनुदानात २०% कपात केल्यामुळे मंडळाचे आर्थिक चित्र स्पष्ट होईपर्यंत दुरुस्तीच्या कोणत्याही नवीन अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी देणे उचित ठरणार नाही.

या इमारतींचे मालक/रहिवाशी विनापरतावा ना हरकत प्रमाणपत्राद्वारे दुरुस्ती करण्यास तयार असल्यास या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी देण्यात येइल. सविस्तर चर्चेअंती असे ठरले की, उपमुख्य अभियंता [दक्षिण] यांनी विना परतावा ना हरकत प्रमाणपत्राद्वारे दुरुस्ती करण्यासाठी भाडेकरूंना उद्युक्त करावे व त्यासंबंधीचा अहवाल पुढील बैठकीत सादर करावा.

पूर्तता
उपमुख्य अभियंता
[दक्षिण]

बाब क्रमांक: १३/५
...............

विषय:- सन १९९४-९५ च्या नंतर वितरीत करावयाच्या गाळ्यांना प्रत्यक्ष खर्चानुसार भाडे आकारण्याबाबत.
..............................

वरील विषयाची बाब टिप्पणी पृष्ठ क्र.१०७ वर सादर केली आहे. उपमुख्य अभियंता [पुनरचना] यांनी या संदर्भात सविस्तर माहिती सभागृहास सादर केली. पुनर्रचित गाळ्यांना रु.०.५० प्रति चौ.फूट या पर्यालत दराने भाडे आकारले जाते. हा भाड्याचा दर त्यावेळेच्या गाळ्यांच्या बांधकामाचा खर्च [रु.२४,०००/-] यावर आधारीत होता. सध्याच्या गाळ्याच्या बांधकामाचा खर्च सुमारे रु.८३,०००/- एवढा होतो. त्यामुळे पर्यालत भाड्याचा दर वास्तव नसल्यामुळे प्रत्यक्ष बांधकामाच्या खर्चाप्रमाणे भाडे आकारण्यांत यावे, असा प्रस्ताव सादर केला आहे.

या विषयावर सविस्तर चर्चा झाली. प्रस्तावांत सादर केल्याप्रमाणे बांधकामाच्या प्रत्यक्ष खर्चाच्या प्रमाणांत पुनर्रचित गाळ्यांना भाडे आकारण्यांत यावे या प्रस्तावाशी सर्व सदस्य सहमत झाले. परंतु प्रस्तावात सादर केल्याप्रमाणे ७ इमारतींना रु.२.३२ प्रति चौ.फूट या भाडे आकारणीच्या दरांत मोठी तफावत वाटत आहे. भाडे आकारणीमधील ही तफावत राहू नये या दृष्टीने सर्व इमारतींना प्रत्यक्ष बांधकाम खर्चाच्या

प्रमाणांत वास्तव भाडे आकारण्याविषयीचा प्रस्ताव सादर करावा, त्याचप्रमाणे इमारती मालकी तत्वावर वितरीत करण्यासाठी कोणते निकष ठरवावेत यासंबंधीचा प्रस्ताव सादर करावा, असे ठरले.

बाब क्रमांक :१३/६

::::::::::::::

विषय:- कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय प्रतिक्षानगर, सायन यांनी शाळेसाठी मागितलेल्या पर्यायी गाळ्यांविषयी.

:::::::::::::::::::::::::::::

वरील विषयाची बाब टिप्पणी पृष्ठ क्र.१०९ वर सादर केली आहे. त्यावर सविस्तर चर्चा झाली. सदस्यांनी सूचना केली की, सर्वच संक्रमण शिबिरांत शाळा, दवाखाना इत्यादी मूलभूत सोई उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. सविस्तर चर्चेअंती असे ठरले की, सव संक्रमण शिबीरांच्या संदर्भात पुढील निकषांच्या आधारे संक्रमण शिबीरांत शाळा व दवाखाना या प्राथमिक सुविधा उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे काय या संबंधीचा प्रस्ताव मंडळापुढे सादर करणे.

पूर्तता
उपमुख्य अधिकारी (सं.शि)

[१] संक्रमण शिबीरांतील एकूण गाळे.

[२] संक्रमण शिबीराच्या परिसरांत शाळा, दवाखाना, हॉस्पिटल इत्यादी प्राथमिक सुविधा उपलब्ध आहेत काय ?

संक्रमण शिबीरांत प्राथमिक सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक उपलब्ध व्हावा यासाठी मुंबई महानगरपालिका व शासनास प्रस्ताव सादर करावा, अशीही सूचना करण्यांत आली.

पूर्तता
उपमुख्य अभियंता
[पुनर्रचना]

....९/-

बाब क्रमांक : १३/७

विषय :- उपकरपात्र इमारतींच्या पुनर्विकासासाठी "ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करणे.

या विषयाचे प्रस्ताव पृष्ठ क्रमांक १११ ते १७३ वर सादर केले आहेत. पूर्वी मंडळापुढे सादर केलेल्या प्रस्तावांच्या संदर्भात मंडळाच्या निर्णयाच्या अनुषंगाने अनुपालन अहवाल पृष्ठ क्र.३५ व ३७ वर सादर केलेला आहे. या सर्व प्रस्तावांवर सविस्तर चर्चा झाली.

गॉड गिफ्ट ११२-१२०, ना.म.जोशी मार्ग या मालमत्तेच्या पुनर्विकासाच्या संदर्भात मंडळाच्या निर्णयानुसार मा.सदस्य सर्वश्री शंकरराव पिटला, गजेंद्र लष्करी व रॉकी क्रास्टो यांनी इमारतीस भेट देऊन तेथील रहिवाशांशी चर्चा करुन दि.२०.७.९३ रोजी अहवाल सादर केला आहे. त्या अहवालानुसार या इमारतीच्या पुनर्विकासासाठी "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान न करता मंडळाने या ठिकाणी पुनर्बांधणी योजना राबवावी अशी सूचना सदस्यांनी केली होती. मुख्य अधिकारी यांनी या संदर्भात प्रतिपादन केले की, शासनाने २३.१.८९ च्या पत्राअन्वये जे घरमालक व भाडेकरु स्वबळावर पुनर्विकास करण्यासाठी पुढे येतील त्यांना उदार धोरणाने "ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याची सूचना केली आहे. शिवाय मंडळाकडे दुरुस्ती व पुनर्बांधणी योजनेसाठी उपलब्ध असलेला अपुरा निधी लक्षात घेता जे घरमालक स्वबळावर इमारतीचा पुनर्विकास करुन रहिवाश्यांना नवीन इमारतीत सामावून घेण्यास तयार असतील व प्रस्ताव सर्व दृष्टीने परीपूर्ण असेल तर "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करणे उचित ठरेल. सदस्यांनी असे निदर्शनास आणून दिले की, घरमालक नवीन इमारतीत सर्व भाडेकरुंना सामावून घेऊ शकेल काय याविषयी रहिवाशी साशंक आहेत. नियमानुसार जुन्या सर्व

| | |
|---|---|
| पूर्तता<br>निवासी कार्यकारी<br>अभियंता | रहिवाश्यांना घरमालकाने नवीन इमारतीत सामावून घ्यावे व रहिवाशांवर अन्याय होणार नाही याविषयी कोणती उपाययोजना करता येईल, या अहवालासह प्रस्ताव पुन्हा सादर करावा असे ठरले. भूकर पहाणी क्र.७२८, गिरगांव विभाग इमारत क्र.१२२ आर्देशीर दादी स्ट्रीट, अशोक निवास या इमारतीच्या पुनर्विकासाच्या संदर्भात सदस्यांनी मुद्दा उपस्थित केला की, या इमारतीस ८८ [३] अ अन्वये प्रमाणपत्र प्रदान केले आहे व हे प्रमाणपत्र रद्द केल्यानंतर पुनर्विकासासाठी "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्यांत यावे. या संदर्भात मुख्य अधिकारी यांनी खुलासा केला की, म्हाडा अधिनियम ८८ [३] [अ] अन्वये इमारत प्रमाणित दुरुस्ती खर्चाच्या पलिकडील आहे असे प्रामणपत्र प्रदान केले जाते, व हे प्रमाणपत्र प्रदान केल्यानंतरही इमारतीच्या पुनर्विकासासाठी "ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यांस हरकत नाही. |
| पूर्तता<br>निवासी कार्यकारी<br>अभियंता. | सविस्तर चर्चेअंती असे ठरले की, श्री.चेतन शहा यांनी उपस्थित केलेल्या मुद्याच्या संदर्भात सविस्तर टिप्पणीसह प्रस्ताव पुन्हा मंजुरीसाठी सादर करावा. भूकर पहाणी क्र.१/३०० माझगांव विभाग, पारशी विडो चाळ [फाईल क्र.५६१] या इमारतीच्या पुनर्विकासाचा प्रस्ताव प्राप्त न झाल्याचे कांही सदस्यांनी निदर्शनास आणून दिले. सविस्तर चर्चेअंती हा प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करावा, असे ठरले. |
| पूर्तता<br>निवासी कार्यकारी<br>अभियंता. | सविस्तर चर्चेअंती उर्वरित प्रस्तावांना पुनर्विकासासाठी "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करावे, असे एकमताने ठरले. |

ठराव क्रमांक:१३/९७

पुढील प्रमाणे, ६ मालमत्तेच्या पुनर्विकासाच्या प्रस्तावांना "नाहरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्यांत यावे, असा निर्णय एकमताने घेण्यांत आला.

[१] भूकर पहाणी क्र.१९५/१०, माटुंगा विभाग, भूखंड क्र.२४७, दादर माटुंगा इस्टेट इमारत क्र.२५, हिंदु कॉलनी रोड [तेलंग रोड], माटुंगा "राम नारायण निवास" या मालमत्तेचा पुनर्विकास,

२] भूकर पहाणी क्र.१०८/१०, माटुंगा विभाग, भूखंड क्र.१०९, दादर माटुंगा इस्टेट इमारत क.६६ सर भालचंद्र रोड, हिंदु कॉलनी येथील "हरीकृपा" या मालमत्तेचा पुनर्विकास.

३] भूकर पहाणी क्र.२२४, भायखळा विभाग, इमारत क्र.२६२,२६४-अे, २६४-बी बेलासीस रोड लियाकत मंजील, झिया मंजील या मालमत्तेचा पुनर्विकास.

४] भूखंड क्र.३/४९३ मलबार हिल विभाग, इमारत क्र.४ काशिबाई नवरंग मार्ग, या मालमत्तेचा पुनर्विकास.

५] अंतिम भूखंड क्र.१२४९, नगर रचना योजना क्र.४ माहिम विभाग,इमारत क्र.९६,९६-बी व ९४ ओल्ड प्रभादेवी रोड, लादीवाला चाळ या मालमत्तेचा पुनर्विकास.

६] भूकर पहाणी क.२/३ आणि ३/३ माटुंगा विभाग इमारत क्र.८४, ८४-अे, नायगांव क्रॉस मार्ग,दस्तूरवाडी या मालमत्तेचा पुनर्विकास.

विषय:- अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय.

..........................

१] श्री. हेमराज शहा, उपसभापती यांनी सूचना केली की, छोटे भूखंड व आरक्षणाखालील इमारतीच्या रहिवाशांना निवारा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी मंडळावर आहे. या इमारतींची यादी सादर करण्याची सूचना त्यांनी केली. मुख्य अधिकारी यांनी खुलासा केला की, आरक्षणामुळे पुनर्रचित न होणाऱ्या तसेच छोटया भूखंडामुळे पुनर्बांधणी अशक्य असलेल्या इमारतींमधील रहिवाशांची बृहतसूची केली असून त्या यादीतील प्राधान्यानुसार अतिरिक्त गाळ्यांचे वितरण केले जात आहे. बृहतसूचीची यादी पुढील बैठकीत सादर करण्यांत येईल असे मान्य करण्यांत आले.

पूर्तता
उपमुख्य अधिकारी
[पु.गा.]

मंडळाची १४ वी बैठक मंगळवार दिनांक १४ डिसेंबर १९९३ रोजी सकाळी ११.०० वाजतां आयोजित करण्याचे एकमताने ठरले.

....१२/-

मा. सभापती, उपसभापती, सदस्य, अधिकारी यांचे आभार मानल्यानंतर अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपन्न झाल्याचे जाहीर करण्यांत आले.

सही/-
सचिव
मुं.इ.दु.व पु.मंडळ, मुंबई.

सही/-
सभापती
मुं.इ.दु.व पु.मंडळ, मुंबई.

मुख्य अधिकारी
मुंबई इमारत दुरुस्ती
व पुनर्रचना मंडळ.

पृष्ठ क्र. ४ वर सुधारणा – रिक्त गाळ्यांची यादी सादर करण्याचा उल्लेख.

सचिव
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ

सभापती.
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ